I J R S S I S, Vol. V, Issue (2), May-2017: 1-3 ISSN 2347 – 8268

INTERNATIONAL JOURNAL OF RESEARCHES IN SOCIAL SCIENCES AND INFORMATION STUDIES
© VISHWASHANTI MULTIPURPOSE SOCIETY (Global Peace Multipurpose Society) R. No. MH-659/13(N)
www.vmsindia.org

# लोकसाहित्य आणि तुकाराम गाथा

**देशमुख अ.**
प्रियदर्शिनी महिला महाविद्यालय, वर्धा
Email: *avdeshmukh4@gmail.com*

**सारांश :** संत तुकाराम महाराज अभंग निर्मितीसाठी सुप्रसिद्ध आहेत. या शिवाय त्यांनी एका नवीन विषयाला हात घातला व त्यावर नानाविध प्रकारची रचना केली ही रचना अतिशय महत्त्वपूर्ण असून ती लोकासाहित्यपर आहे व लोकपरंपरेची आठवण करुन देणारी आहे. तुकाराम महाराजांनी लोकपरंपरेचे जे रक्षक आहेत, मग तो वाघ्या-मुरळी असोत, गोंधळी, सरवदा सादर करणारे तंतुकार असोत, वैराग्याची पदे गाणारे बाळसंतोष असोत, जगदंबेचे बेभान होऊन नृत्य करत स्तुती करणारे गोंधळी असोत किंवा गावोगावी सकाळच्या वेळी सडासंमार्जन झालेल्या घरोघरच्या अंगणात नृत्य करणारे वासुदेव असोत. या सर्वांनी पिढ्यानूपिढ्या आणि शतकानुशतके ह्या लोकपंरपरा जपल्या आणि एकमेकांच्या भूमिकेवर कोणतेही आक्रमण न करता आपली लोकगितांची परंपरा मात्र मोठ्या निष्ठेने जोपासली ती तुकाराम महाराजांना भावली आणि तुकारामांनी वासुदेव, गोंधळी, वाघ्या-मुरळी, सरवदा यावर अतिशय कर्णमधुर गेय पदे रचली व त्यामधून पांडुरंगाच्या भक्तीचा जयघोष सर्व महाराष्ट्रभर केला.

**बिजशब्दः** वाघ्या-मुरळी, लोकासाहित्य, तुकाराम गाथा

**प्रस्तावनाः**

"संतकृपा झाली । इमारत फळा आली
ज्ञानदेवे रचिला पाया । उभारिले देवालया
नमा तयाचा किंकर । तेणें केला विस्तार
जनार्दन एकनाथ । खांब दिला भागवत
तुका झालासे कळस । भजन करा सावकाश"

भागवत धर्म मंदिराचे कळस असलेले तुकाराम महाराज हे अभंग निर्मितीसाठी सुप्रसिद्ध असेल तरी त्यांनी इतरही रचना प्रकार हाताळलेले आढळून येतात. या रचना प्रकारात हिंदी साहित्याशी नाते सांगणारी साखी-वजा रचना आहे. तशीच पंडिती वळणाची आठवण करुन देणारी श्लोकबद्ध रचनाही आहे. त्यांनी अनेक आरत्या लिहिलेल्या आहेत व त्या गेय असल्यामुळे ती सर्व पदे आहेत. याशिवाय किती तरी पदरचना त्यांनी केली आहे त्या सर्व पदांचा समावेश त्यांच्या अंभग गाथेत करण्यात आला आहे. याशिवाय तुकाराम महाराजांनी एका नवीन अशा विषयाला हात घातला व त्यावर नानाविध प्रकारची रचना केली. ही रचना अतिशय महत्त्वपूर्ण असून ती लोकसाहित्यपर आहे. वासुदेव, गोंधळ, आंधळा, पांगूळ, सरवदा, वाघ्या-मुरळी, डांक, सौरी, गावगूंड, अशा पद्धतीची ही रचना आहे. ती उघडच लोकसाहित्याची व लोकपरंपरेची आठवण करुन देणारी आहे.

तुकाराम महाराजांप्रमाणे त्यांचे बंधू कान्होबा यांनी अशाच धर्तीची रचना केली आहे. त्याशिवाय ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ या तीनही थोर वारकरी संतांच्या अभंग रचनेतही लोकसाहित्य व लोकपरंपरेची आठवण करुन देणारी रचना दिसून येते. याचा अर्थ असा की, ज्ञानदेव काळापासून सर्व वारकरी संतांनी लोकसाहित्य आणि लोकपरंपरा यांची केवळ दखलच घेतली असे नव्हे तर, त्यांचे लोकजीवनातील स्थान आणि महत्त्वही त्यांनी नेमके ओळखले होते आणि म्हणून लोकसाहित्यातील नानाविध रचना प्रकार हाताळून त्या रचनांमधून लोकजीवनाच्या प्रबोधनाचे कार्य संतांनी सातत्याने केले त्यापैकी तुकाराम महाराज एक आहेत. आपण भक्तीचा डांगोरा पिटण्यासाठी वैकुंठाहून येथे आलो आहोत असे तुकाराम स्वच्छपणे नमूद करतात.

"आम्ही वैकुंठवासी । आलो याचि कारणासी
बोलिले जे ऋषी । साच भावे वर्तावया
पिटू भक्तीचा डांगोरा । कळिकाळासी दरारा
तुका म्हणे करा । जयजयकार आनंदे"

विठ्ठल भक्तीचा प्रसार करणे हे त्यांच्या साहित्याचे प्रधान उद्दिष्ट होते आणि ज्या ज्या साहित्यातून आणि वाङ्मय प्रकारातून भक्तीचा प्रसार करता येईल ते ते सर्व रचना प्रकार तुकाराम महाराजांनी हाताळले व त्यामधून विठ्ठल भक्ती गावोगावी व घरोघरी पोहचवली.

तुकाराम महाराज हे अतिशय विचक्षण असे महापुरुष होते. त्यांचा जन्म एका मातब्बर मराठा कुंटुबात झाला होता. मोरे हे त्यांचे आडनाव होते. त्यांचा वाण्याचा व्यवसाय होता. त्यांचे आयुष्य प्रामुख्याने देहू या गावी व्यतीत झाले असले तरी पंढरपुरच्या वाऱ्याही ते नित्य करत होते. देहू जवळच इंद्रायणीच्या काठी आळंदी हे प्रख्यात तीर्थक्षेत्र आहे आणि ज्ञानेश्वरांच्या स्तवनपर तुकारामांनी अभंग रचनाही केली आहे. त्यांचे अभंग बारकाईने वाचले तर एकनाथांच्या पैठणशी त्यांचा संबंध होता असेही दिसून येते. वाराणसी उर्फ काशीक्षेत्राचा स्पष्ट उल्लेख त्यांनी एका अभंगात केला हे सर्व जमेस धरले तर देहू पुरतेच त्यांचे जीवन मर्यादित नसून पंढरपूर, पैठण व आळंदी या वारकऱ्यांना प्रिय असलेल्या स्थानांशी त्यांचा संबंध होता असे दिसून येते. याचे प्रत्यंतर त्यांच्या अभंग रचनेतही दिसून येते. त्या शिवाय आपल्या अभंगात त्यांनी ज्या ज्या विषयाला स्पर्श केला आहे त्यापैकी एक विषय 'कवीश्वरा'चा आहे. कवीश्वर ही एक साहित्य क्षेत्रातील उच्च

पदवी आहे व काव्य निर्मितीशी तिचा संबंध आहे. विशेषतः विद्वान पंडितांचा वर्ग व त्या पंडित कवींचे अनुकरण करणारा वर्ग हा विदग्ध व अभिजात परंपरेशी संबंधित असून या दोहोंमध्येच 'कवीश्वर' ही संज्ञा अनेकांनी वापरलेली आढळून येते. काव्य निर्मितीच्या क्षेत्रात हे कवीश्वर विद्वान पंडित असले तरी ते आपल्या काव्यामधून शृंगाररस, चमत्कृती, अलंकार, नानाविध काव्य छंद यानुसार आपले काव्य करणारे होते. थोडक्यात हे सर्व कवीश्वर निखळ लौकिकवादी असून शृंगारयुक्त रचनेकडे त्यांचा मोठ्या प्रमाणावर कल असे परंतु तुकाराम महाराज हे भक्तीचा डांगोरा पिटणारे संत कवी होते.

''वाचे बरवे कवित्व । कवित्व बरवे रसिकत्व
रसिकत्व परतत्व । स्पर्शू जैसा''

या सुप्रसिद्ध ओवीतही परतत्व स्पर्श हा काव्य निकष ज्ञानदेवानी सादर केला. हा निकष तुकारामांना पूर्ण मान्य होता. ज्ञानदेवांनी शांतरसाचा तर एकनाथ, तुकारामांनी भक्ती रसाचा पुरस्कार केला. नरस्तुती प्रधान काव्य रचना त्यांना अमान्य होती म्हणून कवीश्वरांचे जे पंडिती काव्य हे लौकिक प्रधान असल्यामुळे तुकारामांना अमान्य होते. त्या काव्याचा त्यांनी जोरदार निषेध केला आहे तो एवढा की, त्यांचा उल्लेख ते 'उष्ट्या पत्रावळी चाखणारे कवीश्वर' अशा कडक शब्दाने करतात. येथे पांडित्यासाठी निर्माण झालेले अनुकरणात्मक काव्य आणि शृंगारिक असलेले मनोरंजनपर काव्य आपल्याला मान्य नाही हे तुकारामांनी स्पष्ट केले आहे. कवीश्वरांचा निषेध करणारे तुकाराम लोकसाहित्य व लोकपरंपरेची मात्र आत्मियतेने दखल घेतात आणि त्या पद्धतीची रचना करुन लोकसाहित्या विषयी आदर स्पष्ट करतात.

लोकसाहित्य आणि लोकपरंपरा हा मानवी जीवनातील असा एक घटक आहे की, त्याची दखल घेतल्याशिवाय कोणालाही पुढे जाता येत नाही. संत परंपरा, शाहिरी परंपरा, पौराणिक परंपरा या तीनही परंपरा लोकसाहित्याचे ऋण मान्य करणाऱ्या आहेतच आहेत पण ललित साहित्य देखील लोकसाहित्याला मानाचा मुजरा केल्याशिवाय राहत नाही. लोकपरंपरेतील कितीतरी संकेत ललित साहित्याने स्विकारलेले आहेत निर्सग हा लोकसाहित्याचा अंगभूत विशेष आहे या निसर्गाचे मधुर वर्णन ललित साहित्याने स्विकारले आहे. पशू, पक्षी, नद्या व पर्वत नानाविध रुपाने नटलेली वनस्पती याप्रमाणेच चंद्र, सूर्य, आकाश, वायू, पृथ्वी, जल हे निसर्गातील सर्व घटकही लोकसाहित्यात सजीव रुपाने दिसून येतात अशी चराचर सृष्टी हा लोकसाहित्याचा आत्मा आहे आणि ललित साहित्या प्रमाणे संत परंपरेनेही तो मानला आहे. पाडुरंगाच्या भक्तीसाठी सर्वस्वाचा त्याग करणारे तुकाराम मात्र वन्य पशू, पक्षी आणि वृक्षराजी हे आमचे सोयरे आहेत.

'वृक्ष वल्ली आम्हा सोयरी वनचरे । पक्षी ही सुस्वरे आळविती' एवढे आत्मियतेचे नाते ते निसर्गाशी सांगताना दिसतात. सतत वाहणारी इंद्रायणी आणि पंढरपूरची चंद्रभागा ह्या तर तुकोबांच्या दोन जीवलग मैत्रीणी आहेत. त्यांच्या तीरावर तुकाराम देहभान विसरुन भगवंताचे संकीर्तन करतांना आढळतात.

तुकाराम महाराज लोकपरंपरेचे जे रक्षक आहेत मग ते वाघ्या-मुरळी असोत, गांधळी, सरवदा सादर करणारे तंतुकार असोत, वैराग्याची पदे गाणारे बाळसंतोष असोत, जगदंबेचे बेभान होऊन नृत्य करुन स्तुती करणारे गोंधळी असोत किंवा गावोगावी सकाळच्या वेळी सडासंमार्जन झालेल्या घरोघरच्या अंगणात नृत्य करणारे वासुदेव असोत हे सर्व तुकारामांना प्रिय होते. या सर्वांनी पिढ्यानूपिढ्या आणि शतकानुशतके ह्या लोकपरंपरा जपल्या आणि एकमेकांच्या भूमिकेवर कोणतेही आक्रमण न करता आपली लोकगितांची परंपरा मात्र मोठ्या निष्ठेने जोपासली ती तुकारामांना भावली आणि त्यांनी वासुदेव, गोंधळी, सरवदा, वाघ्या-मुरळी यावर अतिशय कर्णमधुर गेय पदे रचली व त्यामधून पाडुरंगाच्या भक्तीचा जयघोष सर्व महाराष्ट्रभर केला.

वासुदेव हा कृष्णाचे रुप घेऊन सकाळच्या वेळी फेर धरुन अंगणात नृत्य करतो आणि त्याचे स्वागत गावागावातल्या भगिनी मोठ्या आदराने करतात. वासुदेवाच्या रुपाने बाळकृष्णच त्यांच्या अंगणामध्ये नृत्य करतो असे त्यांना वाटते. हे लोकगीत बाळकृष्णाचे जे विठ्ठल रुप आहे त्याच्या भक्ताला प्रिय असल्यास नवल नाही म्हणून तुकारामांनी वासुदेवपर रचना केली आहे.

''गातो वासुदेव मी ऐका । चित्त ठेवून ठायी भावे ऐका
डोळे झाकुनी रात्र करु नका । काळ करी बैसला लेखा गा
तुका म्हणे रे धन्य त्याचे जिणे । जी ही घातले वासुदेव दान
त्याला न लगे येणे जाणे । जाले वासुदेवी राहाणे गा''

तुकारामाच्या गाथेत काही रचना पांगूळ-आंधळा व आंधळा-पांगूळपर आहेत आंधळा हा दृष्टी नसलेला दुर्देवी व्यक्ती आहे पण त्याची जीवन आकांक्षा जबरदस्त असते. तुकारामांनी नेमका हा धागा पकडला व 'आंधळा' या विषयावर रचना केली.

''सहज मी आंधळा गा । निज निराकार पंथे
वृत्ती हे निवृत्ती जाली । जन न दिसे तेथे''

आंधळ्या सारखाच दुर्देवी असलेला दुसरा जीव पांगूळ आहे. तुकारामांनी त्याची ही मायेनी विचारपूस केली व त्यावर पद रचना केली.

''पांगूळ जालो देवा । नाही हात ना पाय
बैसलो जयावरी । सैराट ते जाये
खेटिटां कुंप कांटी । खुंट दरडी न पाहे
आधार नाही मज कोणी । बाप ना माय''

परंतु खरी मौज पुढे आहे आंधळा आणि पांगूळ हे समाज जीवनात वेगवेगळे स्वतंत्र घटक आहेत. आंधळ्याचे दुःख वेगळे, पांगुळाचे दुःख वेगळे या दोहोंचा विचार तुकाराम महाराज जरुर करतात पण याही पेक्षा एक पाऊल ते पुढे टाकतात. आधंळा व पांगूळ या दोहोंनाही ते एकत्र आणतात. आंधळा हा दृष्टीहीन असला तरी तो चालू शकतो आणि पांगळा हा डोळस असला तरी चालू शकत नाही म्हणून तुकारामांनी चालणारा आंधळा व पाहणारा पांगूळ या दोहोंना एकत्र आणले.

''आंधळा पांगळ्याचा । एक विठोबा दाता
प्रसवले विश्व । तो ची सर्व जाणता
घडी मोडी हेळमात्रे । पापपुण्य संचिता
भव दुःख कोण तारी । तुजवाचुनी''

ज्याने त्याने आपआपले दुःख कमी केले यामधून तुकारामांनी आंधळा पांगूळ अशी संमिश्र रचना केली व

लोकपरंपरेला आणि लोकगीताला सर्वस्वी नवीन वळण दिले. तुकारामाचे हे कार्य लोकपरंपरेच्या वाङ्मयीन इतिहासात अजरामर आहे यात शंका नाही.

आंधळा पांगळा या रचने प्रमाणे 'डांक' या शीर्षका खाली त्यांची तीन, चार पदे आहेत.

''चौक भरियेला आसनी । पाचारिली कुलस्वामीनी
वैकुंठवासिनी ये धावोनी । झडकरी''

डांक म्हणजे नगारा देवीच्या मंदिरात नगारा वाजवतात विठ्ठलरुपी देवीच्या मंदिरात भक्तीचा जो नगारा तुकारामांनी वाजवला तो येथे आढळून येतो. वास्तविक आरतीच्या वेळी किंवा उत्सव प्रसंगी नगारा वाजवण्याची पद्धत होती. या साध्या गोष्टीचा उपयोग त्यांनी विठ्ठल भक्ती पद रचनेसाठी करुन घेतला व त्यावर लोकसाहित्याच्या धर्तीवर गेय स्वरुपाची रचना केली.

त्याच प्रमाणे 'गावगूंड' या विषयावरही तुकारामांनी रचना केली. कोणत्याही गावात काही लोक गूंड प्रवृत्तीचे असतात. लोकांना त्रास देणे हे त्यांचे उद्दिष्ट असते.

''आम्ही जालो गावगूंड । अवध्या पुंत भूतांसी
दुसरे ते खेळो आले । एका बोले ते मित्रा''

तुकारामाच्या लोकसाहित्यपर रचनेत 'सौरी' या विषयावर दोन, तीन रचना आहेत. 'सौरी म्हणजे स्वैर आचरण करणारी स्त्री. निती नियमांचा पदोपदी भंग करणारी उन्मत्त स्वरुपाचे जीवन जगणारी अशी जी स्त्री तिला सौरी म्हणतात'. अर्थात समाज अशा स्त्रियांची पदोपदी अवहेलना करतो यात शंका नाही. पण तुकारामांनी अशा व्यक्तींनाही जवळ केले भगवद्गीतेच्या नवव्या अध्यायात भगवंताने असे म्हटले आहे की, पापयोनीत जीवन जगणारे जीव हे कितीही पापाचरण करत असले तरीही ते माझ्या भक्तीचे अधिकारी आहेत. ज्ञानेश्वर महाराज सुद्धा 'ज्ञानेश्वरी'त नवव्या अध्यायात म्हणतात,

''जे आघवेया अधमांची शेवटी
तिये पापयोनीही किरीटी जन्मले जे
म्हणोनी कुळजाति वर्ण । हे आघवेची अकारण
एथ अर्जुना माझेपण । सार्थक ऐक''

ज्ञानदेवांचे हे भाष्य डोळ्या समोर ठेवून उन्मुक्त जीवन जगणाऱ्या स्त्रिवरही रचना केली व ती सुद्धा भक्तीची अधिकारी आहे असे सांगितले.

अशा प्रकारे ज्ञानदेवांचा परतत्व विचार व भक्तीचे स्वरुप आपल्या लोकसाहित्यपर रचनेतून तुकारामांनी दाखवून दिले आहे.

**संदर्भ सूची**

१) डॉ. प्रभाकर मांडे, 'लोकसाहित्याचे स्वरुप', परिमल प्रकाशन, औरंगाबाद
२) भिडे अनंत बाळकृष्ण, संपादक, 'सटीप श्री ज्ञानेश्वरी', मुंबई
३) नासिराबादकर, 'प्राचीन मराठी वांङ्मयाचा इतिहास', फडके प्रकाशन, कोल्हापूर
४) तुकारामाचे निवडक शंभर अभंग
५) महाराष्ट्र शासन, 'तुकाराम गाथा', शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई

*******